RNI NO - MHMAR/26/A2042

साप्ताहिक

महाविद्यालय खबरबात

MAHAVIDYALAY KHABARBAT

संस्थापक
मुख्य संपादक - डॉ. राजकुमार मा.कोल्हे

डोंबिवली,कल्याण,ठाणे,रायगड,नागपुर येथुन प्रकाशित

संपादक - डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार मा.कोल्हे

■ वर्ष १ ■ अंक ३ ■ गुरुवार, २५ जून ते १ जुलै २०२६ ■ किंमत ३ रुपये ■ पाने ४

जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये जन गण मन शाळेच्या वर्धापन दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल

जे एम एफ रौप्य महोत्सव स्मरणिका अनावरण....





















डोंबिवली (प्रतिनिधी) -

जे एम एफ संस्थेची रौप्य महोत्सवाची सांगता होत असतानाच दिनांक २३ जून 2008 रोजी स्थापन केलेली जन गण मन इंग्रजी माध्यमिक शाळेचा १९ वा वर्धापन दिन तसेच जन गण मन विद्यामंदिर चा 12 वा वर्धापन दिन सकाळ आणि दुपारच्या सत्रात मधुबन वातानुकूलित दालनात अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांसह साजरा करण्यात आला.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे, संस्थापिका सचिव डॉ प्रेरणा कोल्हे, खजिनदार जान्हवी कोल्हे, मुख्याध्यापिका ज्योती मॅडम, तेजावती कोटीयन, तसेच मुख्य अतिथी डॉ.मारोतराव कोल्हे,निवृत्त प्राचार्य श्री.परशुराम जी भांगे, सौ. पुष्पा भांगे, संगीता चौधरी यांचे स्वागत करून सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमांच्या सुरुवातीलाच ,संस्थापक डॉ राजकुमार कोल्हे यांनी स्वतः लिहिलेले जन गण मन है स्कूल हमारा..हे गाणे हजारो विद्यार्थ्यांनी गाऊन शाळेला मानवंदना दिली. त्याचबरोबर नृत्य शिक्षक अभिषेक देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थिनींनी आपल्या नृत्यातून सरस्वती वंदना सादर केली तर नाट्य विभागाचे शिक्षक प्रमोद पगारे, सौ.कविता गुप्ता , नितेश मेस्त्री यांच्या दिग्दर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ' माझी शाळा ' हा विषय घेऊन नाटक सादर केले.पावसाची आतुरतेने वाट पाहात असतानाच इयत्ता पाचवी ते सातवी व इयत्ता दुसरी ते चौथी च्या विद्यार्थिनींनी संगीत शिक्षिका सौ.श्रेया कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पावसाचे गाणे येरे घना आणि नाच रे मोरा सुरेल आवाजात सादर केले व आशाताई भोसले यांना अर्पण केले.

संपादक श्री.रोहित राजगुरू व त्यांच्या चमू ने बनवलेली पंचवीस वर्षाची शाळेचा प्रवास याबद्दल एक चित्रफित दाखवण्यात आली .

ज्ञान हा जगण्याचा पाया आहे आणि ज्ञानाचा स्त्रोत जिथून पाझरतो ते ज्ञानपीठ म्हणजे विद्यामंदिर म्हणजेच शाळा. जे एम एफ संस्थेच्या पंचवीस वर्षाच्या कारकिदीर्चा रौप्य महोत्सव स्मरणिका अनावरण करण्यात आले. जन गण मन शाळेच्या १९ वर्षाच्या कारकिर्दीत सशक्तपणे आव्हाने पेलून तुम्हा सर्वांना ज्ञान आणि कलेचे खुले दालन उघडून दिले आणि ते तुम्ही सर्व विद्यार्थ्यांनी आत्मसात केले आणि करत आहात हे पाहून जीवन सार्थकी लागले असे मला वाटते, असे उद्गार संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे यांनी आपल्या भाषणात काढले व सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शाळेमध्ये शिशु विहार मधील पहिल्या दिवशी प्रत्येक नवीन येणाऱ्या मुलाला शाळेच्या प्रवेशद्वारा जवळ आल्यावर शाळेच्या आतमध्ये न जाण्यासाठी रडू येते परंतु आकर्षक खेळणी बघून त्यांचे चित्त विचलित होते आणि ते त्या खेळात रमून जातात.दहावीची परीक्षा झाल्यावर तेच विद्यार्थी शाळेच्या प्रवेशद्वारा जवळ जाऊन शाळा सोडून जायचे म्हणून भावनविवश होऊन रडू लागतात आणि शाळेच्या आठवणींनी गहिवरून जातात, हीच तर खरी शाळेचीओढ आणि त्याग आहे असे सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना आपल्या भाषणात सांगितले. तुम्ही मुलांनी आमचे बोट पकडून शाळेत प्रवेश केलात आणि आम्ही तुमचे हात पकडून तुम्हाला तुमच्या भविष्याचा मार्ग दाखवला असेही त्या म्हणाल्या.

मान्यवरांच्या हस्ते वार्षिक स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले तसेच सर्वांना स्मरणिकेची प्रत देखील देण्यात आली.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते ते म्हणजे इस्कॉन मंदिराचे कीर्तनकार गुरुवर्य सुदामा जी ...पान ४ वर...

संपादकीय

भारतीय शिक्षण व्यवस्था : जागतिक तुलनात्मक विश्लेषण

अस म्हणतात की तुम्हाला एखाद्या देशाला गुलाम बनवायचे असेल तर त्या देशाच्या शिक्षण पद्धतीचा अभ्यास करून ती कमकुवत केल्यावरच तुम्ही त्या देशाला गुलाम बनवू शकता. अर्थात शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. भारतासारख्या विशाल, विविधतेने नटलेल्या आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या देशात शिक्षण व्यवस्थेचे महत्त्व अधिकच वाढते. आज भारतीय शिक्षण व्यवस्था अनेक सकारात्मक बदलांमुळे आणि गुणवत्तापूर्ण उपक्रमांमुळे जगासमोर एक आदर्श निर्माण करत आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे सर्वसमावेशकता. ग्रामीण, शहरी, आदिवासी आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. भारतामध्ये शिक्षण केवळ ज्ञानार्जनापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. विज्ञान, गणित, तंत्रज्ञान, कला, क्रीडा आणि संस्कृती यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न शाळा आणि महाविद्यालयांमधून केला जात आहे. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीवा विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे भारतीय शिक्षण क्षेत्रातील एक ऐतिहासिक पाऊल ठरले आहे. या धोरणामुळे विद्यार्थीकेंद्रित शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण, कौशल्य विकास आणि संशोधनाला प्रोत्साहन मिळत आहे. शिक्षण अधिक लवचिक, आधुनिक आणि रोजगाराभिमुख बनविण्याचा प्रयत्न या धोरणातून दिसून येतो. भारतीय विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर आपली बुद्धिमत्ता आणि गुणवत्ता सिद्ध केली आहे. जगातील नामांकित तंत्रज्ञान कंपन्या, संशोधन संस्था आणि विद्यापीठांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग आहे. आयआयटी, आयआयएम, एम्स यांसारख्या संस्थांनी जागतिक दजार्चे शिक्षण देऊन देशाची प्रतिष्ठा उंचावली आहे. डिजिटल क्रांतीमुळे भारतीय शिक्षण व्यवस्थेला नवे बळ मिळाले आहे. ऑनलाइन शिक्षण, स्मार्ट क्लासरूम, डिजिटल लायब्ररी आणि विविध शैक्षणिक अप्समुळे विद्यार्थ्यांना ज्ञानाचे विस्तृत दालन खुले झाले आहे. कोविड-१९ सारख्या संकटाच्या काळातही शिक्षणाची गती कायम ठेवण्यात भारताने उल्लेखनीय कामगिरी केली. भारतीय शिक्षण व्यवस्था आणि इतर देशांतील शिक्षण व्यवस्थेची तुलना भारत हा जगातील सर्वात मोठ्या शिक्षण व्यवस्थांपैकी एक देश आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (ठएढ 2020) लागू झाल्यानंतर भारतीय शिक्षण व्यवस्थेत अनेक सकारात्मक बदल घडत आहेत. तथापि, फिनलंड, जपान, सिंगापूर, अमेरिका आणि जर्मनी यांसारख्या देशांच्या शिक्षण व्यवस्थांशी तुलना केल्यास काही सामर्थ्यस्थाने आणि काही सुधारणा आवश्यक असलेले मुद्दे समोर येतात. १. अभ्यासक्रम आणि अध्यापन पद्धती भारत.अभ्यासक्रम व्यापक आणि सैद्धांतिक ज्ञानावर आधारित.परीक्षा आणि गुणांना अधिक महत्त्व.स्पर्धात्मक परीक्षांवर भर. फिनलंड. विद्यार्थीकेंद्रित शिक्षण.कमी गृहपाठ आणि कमी परीक्षा.सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि आनंदी शिक्षणावर भर. २. शिक्षकांचे स्थान भारत. शिक्षकांना समाजात आदराचे स्थान.अनेक ठिकाणी शिक्षकांवर प्रशासकीय कामांचा अतिरिक्त भार. सिंगापूर. शिक्षकांना अत्यंत उच्च दर्जाचे प्रशिक्षण. शिक्षकांची निवड कठोर निकषांवर.सातत्याने व्यावसायिक विकासावर भर. ३. कौशल्य विकास भारत.पारंपरिक शिक्षणाबरोबर कौशल्याधारित शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न.**NEP 2020** मध्ये व्यावसायिक शिक्षणाचा समावेश. जर्मनी **"Dual Education System"** प्रसिद्ध.शिक्षणासोबत उद्योगांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण.रोजगारक्षमतेचे प्रमाण जास्त. ४. शिस्त आणि मूल्य शिक्षण भारत.संस्कार, नैतिक मूल्ये आणि सांस्कृतिक परंपरांवर भर.विविधता आणि सहिष्णुतेचे शिक्षण. जपान-शिस्त, स्वावलंबन आणि सामूहिक जबाबदारीवर विशेष भर. विद्यार्थी स्वतः वर्ग आणि शाळा स्वच्छ ठेवतात. ५. संशोधन आणि नवोपक्रम भारत-**IIT, IISc, AIIMS** सारख्या संस्था जागतिक स्तरावर प्रसिद्ध.संशोधनासाठी गुंतवणूक वाढविण्याची गरज. अमेरिका. संशोधन आणि नवोपक्रम क्षेत्रात आघाडीवर.विद्यापीठांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्य.भारतीय शिक्षण व्यवस्थेची बलस्थाने.जगातील सर्वात मोठे आणि सर्वसमावेशक शिक्षण जाळे.गणित, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील मजबूत पाया. कमी खर्चात उच्च शिक्षणाच्या संधी.विविध भाषा, संस्कृती आणि ज्ञानपरंपरेचा समावेश.सुधारणा आवश्यक असलेले मुद्दे.पाठांतरावर आधारित शिक्षण कमी करणे. कौशल्याधारित आणि अनुभवाधारित शिक्षण वाढविणे.शिक्षक प्रशिक्षण अधिक सक्षम करणे.ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी कमी करणे.संशोधन आणि नवोपक्रमासाठी अधिक गुंतवणूक.निष्कर्ष भारतीय शिक्षण व्यवस्था ज्ञान, संस्कार आणि संधी उपलब्ध करून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. फिनलंडची सर्जनशीलता, जपानची शिस्त, सिंगापूरची शिक्षक गुणवत्ता आणि जर्मनीचे कौशल्याधारित शिक्षण यांपासून प्रेरणा घेऊन भारत आपली शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवू शकतो. नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून भारत शिक्षण क्षेत्रात अधिक प्रगत आणि विद्यार्थी-केंद्रित व्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. निश्चितच, प्रत्येक व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी काही क्षेत्रे असतात. मात्र, भारतीय शिक्षण व्यवस्थेची व्यापकता, विविधता, उपलब्धता आणि सतत होणारे आधुनिकीकरण यामुळे ती अधिक सक्षम आणि प्रभावी बनत आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम, सुसंस्कृत आणि आत्मनिर्भर भारत घडविण्याचे कार्य ही व्यवस्था यशस्वीपणे पार पाडत आहे. आज गरज आहे ती या व्यवस्थेतील सकारात्मक पैलूंना अधिक बळ देण्याची आणि गुणवत्तेचा स्तर आणखी उंचावण्याची. भारतीय शिक्षण व्यवस्था ही केवळ ज्ञान देणारी व्यवस्था नसून भविष्य घडविणारी एक सशक्त राष्ट्रीय चळवळ आहे. याच व्यवस्थेच्या बळावर भारत जगातील ज्ञानमहाशक्ति बनण्याच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल

डॉ. प्रेरणा राजकुमार कोल्हे
संपादक

अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांबाबत शिक्षण संचालनालयाचा निर्णय.....

(माध्यम, विषय अन् कॉलेज बदलता येणार)



मुंबई - राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात अकरावी, बारावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना माध्यम, विषय, शाखा (शास्त्रा, वाणिज्य, कला) किंवा थेट कनिष्ठ महाविद्यालय बदलण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या सोमवारपासून (ता. २२) ही ऑनलाइन प्रणाली कार्यान्वित होणार आहे. या निर्णयामुळे विद्यार्थी आणि पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या सर्व प्रक्रियेसाठी शिक्षण विभागाकडून विशेष ऑनलाइन संगणकीय प्रणाली विकसित केली आहे. २२ जूनपासून सकाळी दहापासून अधिकृत संकेतस्थळ सुरू होईल. यामुळे विद्यार्थ्यांना अकरावीमधून बारावीमध्ये किंवा अकरावीमधून पुन्हा अकरावीमध्ये प्रवेश घेताना आपले माध्यम, विषय आणि विद्याशाखा बदलण्याची ऑनलाइन सुविधा असेल. राज्य मंडळाव्यतिरिक्त सीबीएसई, आयसीएसई किंवा परराज्यातून आलेल्या दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अकरावीत आणि अकरावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बारावीत राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमात प्रवेश घेता येणार आहे.

पालकांची बदली झाल्यास, शासनाच्या बदली आदेशानुसार विद्यार्थ्यांना त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय बदलण्याची थेट सुविधा देखील देण्यात आली आहे. तसेच इतर काही गंभीर किंवा अपवादात्मक कारणांमुळे कनिष्ठ महाविद्यालय बदलायचे असल्यास संबंधित महाविद्यालयातून आवश्यक पुराव्यांसह ऑनलाइन अर्ज करावा लागेल. हे प्रस्ताव मंजुरीसाठी विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे पाठवले जातील.

बदलासाठी कारण देणे बंधनकारक....

या प्रणालीत बदल करताना प्रत्येक विद्यार्थ्याला बदलाचे ठोस कारण देणे अनिवार्य राहील. ही प्रक्रिया सुलभ व पारदर्शक व्हावी म्हणून संकेतस्थळावर विद्यार्थ्यांसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. कनिष्ठ महाविद्यालयांनी या बदलांची आपल्या स्तरावर तातडीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिले आहेत

फराटे पाटील महाविद्यालयास एक कोटी दंड;

मान्यता मिळविण्यासाठी कर्मचारी कागदोपत्री दाखवून दिशाभूल....



मांडवगण फराटा : येथील फराटे पाटील आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयावर भारतीय चिकित्सा पद्धती राष्ट्रीय आयोगाने तब्बल एक कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. महाविद्यालयाने मान्यता मिळविण्यासाठी अशैक्षणिक व रुग्णालयीन कर्मचारी केवळ कागदोपत्री दाखवून खोटी व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याचा ठपका आयोगाने ठेवला आहे.

आयुष मंत्रालयाच्या अधिपत्याखालील मेडिकल असेसमेंट अँड रेटिंग बोडार्ने हा आदेश जारी केला. सार्वजनिक तक्रार निवारण पोर्टलवर दाखल झालेल्या तक्रारीच्या चौकशीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. चौकशीदरम्यान महाविद्यालयाने दाखविलेले अनेक कर्मचारी प्रत्यक्षात त्याच ट्रस्टच्या इतर महाविद्यालये, शाळा आणि संस्थांमध्ये प्राध्यापक, विभागप्रमुख, प्राचार्य किंवा इतर पदांवर कार्यरत असल्याचे उघड झाले.

काही कर्मचारी एकाच वेळी दोन ते तीन संस्थांमध्ये वेगवेगळ्या पदांवर कार्यरत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले. सुनावणी समितीने कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांमध्ये गंभीर विसंगती असल्याचे नमूद केले. महाविद्यालयाने सादर केलेले स्पष्टीकरण आणि भाग-१ मधील नोंदी परस्परविरोधी असल्याचेही समितीने स्पष्ट केले. आयोगाच्या निरीक्षणानुसार संबंधित कर्मचारी प्रत्यक्ष सेवेत नसताना त्यांना रुग्णालयीन, प्रयोगशाळा, ग्रंथालय, लेखा किंवा इतर अशैक्षणिक पदांवर दाखवून नियमानुसार आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असल्याचा आभास निर्माण केला.त्यामुळेMESAR(UG-Ayurveda)Regulations, 2024 च्या नियम ७१चे थेट उल्लंघन झाल्याचे आयोगाने नमूद केले आहे. MARBISMच्या १५७ व्या बैठकीत सुनावणी समितीचा अहवाल सादर केला. त्यानंतर मंडळाने महाविद्यालयाने खोटी, दिशाभूल करणारी व बनावट माहिती सादर करून मान्यता मिळविण्याचा प्रयत्न केल्याचा निष्कर्ष नोंदविला.

'शिक्षण घेणे कधीही थांबवू नका, कारण जीवन कधीही शिकवणे थांबवत नाही' - ॲड. संजय रुईकर

(होरायझन कॉलेजमध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे भव्य स्वागत)



नांदेडः होरायझन कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, विष्णुपुरी (नांदेड) येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी हॉटेल सिटी प्राईड येथे भव्य ह्यवेलकम' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक, प्राध्यापक आणि संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फिजिओथेरपी हे मानवसेवेचे प्रभावी माध्यम....कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव ॲड. संजय रुईकर यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाची अखंड प्रेरणा दिली. 'शिक्षण घेणे कधीही थांबवू नका, कारण जीवन कधीही शिकवणे थांबवत नाही,' असे सांगत त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. फिजिओथेरपी हे केवळ एक व्यावसायिक क्षेत्र नसून मानवसेवेचे प्रभावी माध्यम आहे. रुग्णांच्या वेदना कमी करून त्यांना पुन्हा स्वावलंबी जीवन जगण्यास सक्षम बनविण्याचे कार्य फिजिओथेरपिस्ट करत असतात, त्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे समाजसेवेची संधी म्हणून पाहावे, असे आवाहन त्यांनी केले.महाविद्यालयीन जीवनातील शिस्त, सातत्यपूर्ण अभ्यास आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षणाचे महत्त्व विशद करत त्यांनी विद्यार्थ्यांना शरीररचना, शरीरक्रिया या विषयांचा सखोल अभ्यास करण्याचा तसेच आधुनिक संशोधन आणि वेळेचे व्यवस्थापन आत्मसात करण्याचा सल्ला दिला.

परीक्षा केंद्रावर सापडला मोबाईल; विद्यार्थिनीचा उडी मारून पळण्याचा प्रयत्न....

पुणे (प्रतिनिधी)राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षेवेळी (NEET-२०२६) हडपसर येथील अण्णासाहेब मगर महाविद्यालय परीक्षा केंद्रावर एक नाट्यमय प्रकार घडला. परीक्षेदरम्यान एका विद्यार्थिनीच्या बाकावर मोबाईल फोन आढळून आल्यानंतर तिला चौकशीसाठी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. त्यानंतर विद्यार्थिनीने जिन्यालगतच्या व्हरांड्यातून उडी मारण्याचा प्रयत्न केल्याने काही काळ परीक्षा केंद्रावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला.

पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधित विद्यार्थिनीची परीक्षा केंद्रात प्रवेश करण्यापूर्वी नियमानुसार तपासणी करण्यात आली होती. हँड-हेल्ड मेटल डिटेक्टरने तिच्या मांडीजवळ दोन वेळा बीप दिल्याने महिला पोलिस कर्मचाऱ्यांना संशय आला. याबाबत वरिष्ठ निरीक्षकांना माहिती देण्यात आली. विद्यार्थिनीने यापूर्वी झालेल्या शस्त्रक्रियेमुळे मांडीमध्ये स्क्रू बसवण्यात आल्याचे सांगितले. त्यानंतर स्वतंत्र खोलीत तिची सखोल तपासणी करण्यात आली. कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून न आल्याने वरिष्ठांच्या परवानगीनंतर तिला परीक्षा देण्यास परवानगी देण्यात आली.

केंद्रप्रमुख डॉ. नितीन घोरपडे यांनी दिलेल्या लेखी अहवालानुसार, परीक्षा सुरू असताना संबंधित विद्यार्थिनीच्या बाकावर मोबाईल फोन आढळून आला. यानंतर ब्लॉक सुपरवायझर यांनी तिला तातडीने महिला पोलिसांच्या ताब्यात दिले. चौकशीदरम्यान विद्यार्थिनीने जिन्याजवळील व्हरांड्यातून उडी मारण्याचा प्रयत्न केला. उपस्थित महिला पोलिस, पोलिस निरीक्षक आणि इतर अधिकाऱ्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून तिला रोखले व समजूत घालून परिस्थिती नियंत्रणात आणली.

यानंतर मोबाईल जप्त करून विद्यार्थिनीला कार्यालयात बसवण्यात आले. सीटी को-ऑर्डिनेटर यांच्या निदेर्शानुसार तिला परीक्षा पूर्ण करण्याची परवानगी देण्यात आली. विद्यार्थिनीच्या पालकांनाही परीक्षा केंद्रावर बोलावण्यात आले होते. परीक्षा संपेपर्यंत तिच्या वर्गाबाहेर महिला पोलिसांचा विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

दरम्यान, परीक्षा सुरळीत पार पडल्यानंतर संबंधित विद्यार्थिनीला तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात देण्यात आले. शहरातील सर्व २६ परीक्षा केंद्रांवरील उत्तरपत्रिका नियमानुसार सिलबंद करून पायलट वाहन आणि सशस्त्र पोलिस बंदोबस्तात स्ट्राँग रूममध्ये जमा करण्यात आल्या. परीक्षा कालावधीत शहरभर सतर्क गस्त आणि वाहतूक व्यवस्थेचाही विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

महत्त्वाच्या शैक्षणिक घडामोडी.....

प्रवेश प्रक्रिया :-

मुंबई विद्यापीठाची पदवी प्रवेशासाठीची ऑनलाईन नोंदणी लिंक मुदतीपूर्वीच बंद झाल्यामुळे अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले आहेत.

क्यूएस रँकिंग.:-

नुकत्याच जाहीर झालेल्या जागतिक रँकिंगमध्ये महाराष्ट्रातील मुंबई विद्यापीठासह इतर सरकारी विद्यापीठांच्या मानांकनात घसरण झाल्याचे समोर आले आहे.

कॅम्पस अपडेट्स :-

मुंबईतील प्रसिद्ध जय हिंद कॉलेजमध्ये 'डेटूर' हा मास मीडिया विभागाचा वार्षिक महोत्सव उत्साहात पार पडला.

परीक्षा वेळापत्रक.:-

मुंबई विद्यापीठाने तृतीय वर्षाच्या २८ सत्र परीक्षांच्या तारखांमध्ये सुधारणा केली आहे.

सुरक्षा आणि इतर घटना.:-

मुलुंडमधील एका कॉलेज परिसरात एकतर्फी प्रेमातून तरुणीवर हल्ल्याची धक्कादायक घटना घडली असून सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

विद्यार्थ्यांना परीक्षेच्या 3 महिने आधी समजणार वेळापत्रक.....

तविद्यापीठाची पहिली सत्र परीक्षा ऑक्टोबरमध्ये, द्वितीय सत्र परीक्षा मार्चअखेरत्न



सोलापूर (प्रतिनिधी) - पुण्यश्लोक सोलापूर अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आता तीन महिने आधीच परीक्षेचे वेळापत्रक समजणार आहे. ऐनवेळी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले जाते, पुन्हा त्यात बदल होतो. त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसतो. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने आता महत्त्वाचा बदल केला आहे.

सोलापूर विद्यापीठात पाच संकुले असून, त्या अंतर्गत सुमारे ५००० विद्यार्थी शिकतात. तर १०९ संलग्नित महाविद्यालयांमध्ये सुमारे ६५ हजार विद्यार्थी प्रवेशित आहेत. सत्र सुरू झाल्यानंतर ९० दिवसांत परीक्षा घेतली जाते. परंतु, अनेकदा ९० दिवस पूर्ण होण्यापूर्वीच वेळापत्रक जाहीर होते आणि विद्यार्थ्यांवर परीक्षेचा ताण येतो. त्यातून अनेकदा विद्यार्थी संघटना विरोध करतात आणि परीक्षेचे वेळापत्रक पुढे ढकलावे लागते. पण, आता तसा प्रकार कायमचा बंद होणार आहे.

विद्यापीठ आता शैक्षणिक सत्र झाल्यानंतर त्याच महिन्यात आगामी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करणार आहे. यंदाची पहिली सत्र परीक्षा ऑक्टोबर महिन्यात सुरू होणार आहे. डिसेंबरपर्यंत परीक्षा संपली की शैक्षणिक वर्षातील शेवटची सत्र परीक्षा मार्चअखेर घेता येईल, जेणेकरून शैक्षणिक वर्षाची सुरवात वेळेत होऊ शकेल, असा त्यामागील उद्देश असल्याचे परीक्षा विभागाकडून सांगण्यात आले.

सोलापूर विद्यापीठाचा पसारा

एकूण संकुले.,..११,प्रवेशित विद्यार्थी ५,०००,

संलग्नित महाविद्यालये ११५,प्रवेशित एकूण विद्यार्थी ६५,०००, विद्यार्थ्यांची ७५ टक्के हजेरी बंधनकारक

विद्यापीठाशी संलग्नित सर्व ११५ महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी आता बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक असणार आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक महाविद्यालयातील वर्गांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे देखील बसविण्याचे आदेश विद्यापीठाने दिले आहेत. ते कॅमेरे कागदावर असू नयेत म्हणून प्रत्येक महाविद्यालयाकडून त्याचा आयपी ॲड्रेस सुद्धा विद्यापीठाने मागितला आहे. शैक्षणिक वर्षात तथा प्रत्येक सत्रात विद्यार्थ्यांची किमान ७५ टक्के उपस्थिती अपेक्षित आहे. यासंदर्भात राज्यपाल भवनाकडून विद्यापीठाला पत्र प्राप्त झाले आहे. त्यानुसार कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती प्र कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी दिली.

विद्यार्थ्यांवर ताण येणार नाही म्हणून...

विद्यापीठातील संकुले व संलग्नित महाविद्यालयांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ मिळावा, त्यासाठी आधीच परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे. सत्राच्या शेवटी वेळापत्रक जाहीर केल्यावर विद्यार्थ्यांना अभ्यासाला अडचणी येतात. त्यामुळे कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली पुढील आठवड्यात परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले जाईल.

- डॉ. श्रीकांत अंधारे,

तुकाराम मुंढेंची मोठी कारवाई! पुणे विद्यापीठाच्या मेसचा परवाना रद्द.....



पुणे (प्रतिनिधी) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिसरातील मध्यवर्ती भोजनगृह (रेफेक्टरी) चालविणाऱ्या मे. श्री स्वामी समर्थ भोजनालय अँड केटरिंग सर्व्हिसेसचा अन्न परवाना अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) निलंबित केला आहे. अन्न सुरक्षेशी संबंधित गंभीर त्रुटी आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली. 'एफडीए' चे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या निदेशाने ही कारवाई करण्यात आली.या भोजनगृहाची अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी १६ जून रोजी तपासणी केली. तपासणीदरम्यान इतरही अनेक गंभीर अनियमितता निदर्शनास आल्या असून, या त्रुटींमुळे अन्न सुरक्षिततेस बाधा निर्माण होण्याची शक्यता असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

काय आढळल्या त्रुटी ?

- अन्न साठवणूक आणि तापमान नियंत्रण नसणे - कीटक प्रतिबंधक उपाययोजनांचा अभाव
- अन्न हाताळणीतील अस्वच्छता
- कच्चे आणि शिजवलेले अन्न यांचे विभाजन योग्य नसणे
- पाण्याच्या गुणवत्तेबाबत अभिलेख नसणे
- कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीची नोंद उपलब्ध नसणे
- कीटक नियंत्रणातील त्रुटी आणि अपुरी स्वच्छता

दरम्यान, संबंधित भोजनगृहाबाबत समाजमाध्यमांवरून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत करण्यात आलेल्या तपासणीत आढळलेल्या त्रुटींचे स्वरूप आणि गांभीर्य लक्षात घेता, सदर अन्न व्यवसाय सुरू राहणे जनआरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते, अशी माहिती 'एफडीए' चे सह आयुक्त (अन्न विभाग) दिगांबर भोगावडे यांनी दिली.

अन्न व औषध प्रशासनाने नुकतंच पुण्यातील स्वारगेट बस स्थानकाशेजारी असलेल्या खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर कारवाई केली होती. या सर्व दुकानांची, स्टॉल्सची तपासणी करुन ते बंद ठेवण्याचे आदेश दिले होते. जोपर्यंत खाद्यपदार्थांशी संबंधित सर्व नियम पाळले जात नाहीत, तोपर्यंत दुकानं बंद ठेवण्याचे आदेश आधिकाऱ्यांनी दिले होते.

राज्यभरात सुरु असलेल्या धडक कारवाईच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. प्रत्येक तक्रारीची दखल प्रशासनाकडून घेतली जात आहे. भेसळखोरांच्या तक्रारी तर आहेतच. पण औषधी दुकानांवर चुकीचं किंवा एक्सपायर झालेलं औषध दिलं तरी लोक थेट तुकाराम मुंढेंकडे तक्रारी करीत आहेत.

विशेष बाब म्हणजे तंबाखू, तंबाखूजन्य पदार्थ, गुटखा अशा प्रतिबंधित पदार्थांची विक्री करणारे, उत्पादन करणारे, वाहतूक करणारे आता मकोकाच्या कक्षेत येणार आहेत. अशा लोकांवर थेट मकोकांतर्गत कारवाई करण्याचे आदेश तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत. त्यामुळे अशा प्रतिबंधित पदार्थांचा व्यापार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

उंचेगाव बु च्या लेकीचा गावकऱ्यांनी केला सन्मान सोहळा



नांदेड उचेगाव बु. (प्रतिनिधी) - कुमारी ऐश्वर्या ज्ञानेश्वर देशमुख उचेगाव बुद्रुक ही नुकतेच विमान सेवेत फ्लाईंग ऑफिसर म्हणून सेवा करण्यास रुजू झाली. त्यामुळे समस्त गावकऱ्यांच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला त्या प्रसंगी उंचेगाव येथील वयोवृद्ध प्रतिष्ठीत नागरीक नारायणराव मारोतराव देशमुख आणि विवेकजी देशमुख जिल्हाप्रमुख नांदेड हे उपस्थित होते. तसेच राजेश्वर देशमुख उपसरपंच यांच्यासह प्रकाशराव देशमुख (श्रीमहादागिर सस्थान अध्यक्ष), शिवाजीराव देशमुख (चेअरमन), व राजू भैय्या तातेराव देशमुख यांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती. त्याप्रसंगी बोलताना कुमारी ऐश्वर्या देशमुख हिने आपण कसे घडलो त्याबद्दल गावकऱ्यांना विद्यार्थ्यांना माहिती दिली. तिने परिस्थितीवर मात करत जिद्द कायम ठेवा ध्येय पादाक्रांत केले तर यशाचा मार्ग नक्की मिळतो. याप्रसंगी बोलताना तिने आपल्या ध्येयातील बऱ्याचश्या आठवणी सांगितल्या त्यामुळे विद्यार्थी वर्गामध्ये एक प्रकारचा हूरूप पसरलेला दिसत होता. याप्रसंगी येथे बराचसा मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यावेळी डोंबिवली टाईम्सचे पत्रकार माधवराव देशमुख यांच्यासह अनेक पत्रकार आणि बराच मोठा जनसमुदाय उपस्थित होता. याप्रसंगी प्रदर्शन देवराजजी बंडे यांनी उपस्थितांचे आभार मानून सुंदर अशा कार्यक्रमाची त्यांनी सांगता केली.

जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस प्रदर्शन संपन्न....







डोंबिवली (प्रतिनिधी) - २१जून हा जागतिक योग दिवस म्हणून संपूर्ण जगात साजरा केला जातो. २०१४ साली आदरणीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी जी यांनी २१ जून हा जागतिक योग दिवस म्हणून अधिकृत घोषणा केली.

त्याच अनुषंगाने जे एम एफ शिक्षण संस्थेमध्ये 20 जून रोजी सकाळ आणि दुपारच्या सत्रात योगा सादरीकरण करण्यात आले.यामध्ये जन गण मन इंग्रजी माध्यमिक शाळा, तसेच जन गण मन विद्यामंदिर , कनिष्ठ महाविद्यालय व वंदे मातरम् पदवी महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षकांनी योग सादर केले. त्याच बरोबर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे व संस्थापिका सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी देखील योगा सादर केला.प्रमुख पाहुणे व योगा प्रशिक्षक डॉ.रवींद्र धुरी, प्रार्थना शहा, माधवी पांचाळ, तसेच उपप्राचार्य तेजावती कोटीयन, वैशाली शिंदे, स्मिता काटकर यांनी सर्व विद्यार्थ्यांना योगाचे प्रशिक्षण दिले व योगाचे आपल्या जीवनात किती महत्व आहे याबद्दल माहिती सांगितली.

शारीरिक आणि मानसिक गोष्टींची सकारात्मक जडणघडण होण्यासाठी रोजच्या दैनंदिन जीवनात योगा करणे खूप फायद्याचे आणि महत्वाचे आहे, शरीराचा विकास आणि मनाचा आत्मविश्वास वाढवण्याचे काम योगा द्वारे होत असते, केवळ एक दिवस योगा न करता नित्य नेमाने रोज करा असा सल्ला आणि मार्गदर्शन संस्थापक डॉ राजकुमार कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना केले व स्वतः वेगवेगळ्या योगासनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

मनावरचा ताण आणि शारीरिक आळस मुळापासून नष्ट करण्याचे माध्यम म्हणजे योगा होय त्यासाठी प्राणायाम, ध्यानधारणा ,योगासने करणे आवश्यक ठरते असे सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले .

अभिषेक देसाई, भावेश सर, दीपाली सोलकर, सौ.श्रेया कुलकर्णी यांनी योग नृत्या द्वारे शिक्षक व विद्यार्थ्यांकडून योगा करून घेतला, तर काही शालेय विद्यार्थ्यांनी देखील काही नवीन आसने करून दाखवली.सर्व मान्यवरांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

सुविचार

आठवणी या चांदण्या सारख्या असतात. कोणती कधी लुकलुकेल हे काही सांगता येत नाही.

छोट्या छोट्या गोष्टींतून मिळणारा आनंद हाच जीवन जगण्याचा आधार असतो, बाकी इच्छा व अपेक्षा तर सतत बदलत असतात.

असलेल्या गोष्टींमध्ये रमता आल की नसलेल्या गोष्टींची हुरहुर लागत नाही.

स्वतःच्या मनावर राज्य करा, लोकांवर नाही. इतरांची टीका, बोलणं किंवा वागणं तुमचं भविष्य ठरवत नाही. उलट त्यांच्या विचारांची उंची आणि सामर्थ्य जगासमोर उघडी पडते.

जर आपण समाजात दररोज घडणाऱ्या वाईट गोष्टींचा अतिविचार करू शकतो ! तसा चांगल्या गोष्टींचा अतिविचार करायला काय हरकत आहे.

भरलेलं घर आणि सुंदर मन, हे फक्त समाधानी व्यक्तींचेच असते. कारण ती व्यक्ती स्वतःकडे जे काही आहे, त्यात खुश असते. आणि इतरांचे वाईट व्हावे, हा विचार ती कधीच करत नाही.

आपली माणसं तुटतील, म्हणून भांडण, वादविवाद टाळणारी माणसं घाबरट नसतात, तर समजूतदार असतात.

स्पष्ट बोलून खरी परिस्थिती मांडणाऱ्या व्यक्ती ज्या लोकांना आवडत नाहीत. त्याच लोकांना अस्पष्ट बोलून दिशाभूल करणाऱ्या व्यक्ती मात्र खूप आवडत असतात.

नातं हे झाडांच्या सावलीसारखं असतं, ज्या झाडाची सावली चांगली आहे, तिथेच माणूस विसावा घेतो. नात्याचंही असंच असतं जिथे मान-सन्मान, आदर आपुलकी आणि माणुसकी असते तिथेच नातं टिकतं.

लवकर जाग येणे कधीही फायद्याचेच असते. मग ती झोपेतून असो, अहंकारातून असो, अज्ञानातून असो किंवा गैरसमजातून.

गुणवत्ता नसेल तर कष्ट करुनही यश मिळवता येते, मात्र कष्ट करण्याची तयारीच नसेल तर गुणवत्ता असुनही काहीही उपयोग नाही.

आनंदाचा गुणाकार, दुःखांचा भागाकार, मित्रांची बेरीज आणि शत्रूंची वजाबाकी ही चार गणिते करुन बघा ! जे उत्तर मिळेल ते असेल, आनंदाची लयलूट.

स्पष्ट बोलून खरी परिस्थिती मांडणाऱ्या व्यक्ती ज्या लोकांना आवडत नाहीत. त्याच लोकांना अस्पष्ट बोलून दिशाभूल करणाऱ्या व्यक्ती मात्र खूप आवडत असतात.

गुणवत्ता नसेल तर कष्ट करुनही यश मिळवता येते, मात्र कष्ट करण्याची तयारीच नसेल तर गुणवत्ता असुनही काहीही उपयोग नाही.

वादळाचं अस्तित्व किती विलक्षण असतं. येण्या अगोदर एखादं पान देखील हलत नाही, आणि आल्यावर मात्र पान देखील शिल्लक राहत नाही. मग ते निसर्गातलं असो किंवा मनातलं. जेव्हा आपले अंतर्गत जग हे शांत असते, तेव्हा बाहेरचे जग अतिशय सुंदर वाटते.

जीवनात खरा आनंद सुखसोयीमुळे, संपत्तीमुळे किंवा दुसऱ्यांनी केलेल्या स्तुतीमुळे होत नाही, तर आपल्या हातून काहीतरी लक्षात ठेवण्यासारखे सत्कृत्ये झाले तरच होतो.

जेव्हा आपले अंतर्गत जग हे शांत असते, तेव्हा बाहेरचे जग अतिशय सुंदर वाटते.

आशीर्वाद आणि सदिच्छा यांचा कोणताही रंग नसतो, तरीही ते मिळाले की, आपल्या आयुष्यात / जीवनात रंग मात्र भरतो.

मानसिक शांती असेल तरच सर्व काही गोड-गोड वाटते, नाहीतर धनाच्या राशीवर लोळून सुद्धा ती टोचायला लागते.

आज उद्या करता करता संपूर्ण आयुष्य निघून जातं. मनासारखं जगायचं मात्र राहून जातं. आयुष्याची स्वप्नं रंगवताना वास्तवाला कधीच विसरायचं नसतं.

आनंदाचा गुणाकार, दुःखांचा भागाकार, मित्रांची बेरीज आणि शत्रूंची वजाबाकी ही चार गणिते करुन बघा ! जे उत्तर मिळेल ते असेल, आनंदाची लयलूट.

आयुष्य म्हणजे एक चालता बोलता रंगमंच आहे. आपण सगळे नाटकांमधिल कलाकार. शास्त्रज्ञ शोध लावत आहेत की मंगळावर जीवन जगता येईल का ? आणि आपण शोधत आहोत की पत्रिकेत मंगळ आहे का.

पान १ वरुन.....आणि त्यांचे अनुयायी यांनी हरे राम हरे कृष्ण भजन सादर करून सर्वांना तल्लीन केले व सर्वजण देहभान हरपून भजन गात थिरकले.त्यानंतर प्रसादाचा भोग देण्यात आला.

कलात्मक शिक्षकांनी सांगितलेल्या कल्पनेतून श्री नरेश पिसाट यांनी मधुबन वातानुकूलित दालनात सुबक रांगोळी आणि सजावट करून शोभा वाढवली तर जे एम एफ कौटुंबिक वृक्ष तयार करून सर्व शिक्षकांनी आपली प्रतिमेने वृक्षाला आच्छादले. यासाठी कला शिक्षिका दीपा तांबे यांनी पुढाकार घेतला व शाळा महाविद्यालयाच्या शिक्षकांच्या प्रतिमा लावून जे एम एफ कौटुंबिक वृक्ष सजवला गेला.

संपूर्ण कार्यक्रमांचे फोटो आणि व्हिडीओ अखिल नायडू, जय लाखारा व निखिल यांनी जबाबदारी ने काढून कर्तव्य बजावले.

पदवीनंतर थेट पीएचडी! विद्यापीठात चार वर्षांच्या अभ्यासक्रमाचे नवे पर्याय विद्यार्थ्यांसाठी खुले...



मुंबई (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू झाल्यानंतर उच्च शिक्षण क्षेत्रात अनेक क्रांतिकारी बदल घडून येत आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी बहुप्रवेश-बहिर्गमन आणि लवचिकता यांसारखे पर्याय खुले केले आहेत. यामुळे आता मुंबई विद्यापीठातील शिक्षण विद्यार्थीकेंद्रित बनले असून, याचा अधिक लाभ विद्यार्थ्यांना होणार आहे.

या धोरणातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम. यापूर्वी बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. हे अभ्यासक्रम विद्यापीठाशी संलग्न तसेच स्वायत्त महाविद्यालयांमध्ये राबविले जात होते. मात्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आता तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासोबतच चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रमही विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

मुंबई विद्यापीठ पदवीच्या चौथ्या वर्षी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना ऑनर्स आणि ऑनर्स विथ रिसर्च आहे. यात दोन पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यात चौथे वर्ष पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यार्ला सन्मान पदवी (ऑनर्स) प्राप्त होते. तर ऑनर्स विथ रिसर्चमध्ये संशोधनासह सन्मान पदवीसाठी (ऑनर्स विथ रिसर्च) विद्यार्थ्यार्ने तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमात किमान ७.५ एकत्रित श्रेणी गुणांक (सीजीपीए) मिळवलेला असणे आवश्यक आहे.

हे साप्ताहिक मालक,मुद्रक,प्रकाशक,डॉ.राजकुमार मा.कोल्हे यांनी जागृती प्रिटींग प्रेस,बी-१०१,भायखळा सर्विस इंडस्ट्रीयल इस्टेट,डी.के.क्रॉस रोड,भायखळा,मुंबई-४०००२७.येथे छापून ५०१,गोपी मॉल रेसिडेन्स,एनएसएस रोड,डोंबिवली (प.),ठाणे,महाराष्ट्र - ४२१२०२.येथुन प्रकाशित केले.संपादक : डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार कोल्हे,
भ्रमणध्वनी :८४५२००५१९८/९२२१४३७४१४ ईमेल : RNI No.: MHMAR/26/A2042

Printed,Published And Owned By.**Dr.Rajkumar M.kolhe** Printed At Jagruti Printg Press,b-101,byculla Service Industrial Estate,D.K.Cross Road, Byculla,Mumbai-400027,andPublished From 501,Gopi Cine Mall Residence,NSS Road, Dombivli West, Thane, Maharashtra.**- 421202**
Editor : Dr.Mrs.Prerna R.Kolhe,Mobile : 8452005198,Email :www.mahavidyalaykhabarbat.in, RNI No.:- MHMAR/26/A2042